| MHKO050042312024 | म.कौ.हि.सं.का.अर्ज नं. ६७/२०२४<br>निशाणी क्र. १३ वर आदेश<br>दिपाली रणजित बगाडे<br>वि.<br>रणजित वजीर बगाडे आणि इतर |
|---|---|

**१.** यातील अर्जदार यांनी प्रस्तुतचे अर्ज हे कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ मधील तरतुदी नुसार तीची कागदपत्रे व दागिणे (स्त्रीधन) मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदार यांनी मूळ अर्ज वि.प. यांचे विरोधात कौंटुंबीक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अन्वये कोर्ट मजकूरी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत निशाणी १३ च्या अर्जात असे कथन केले आहे की, वि.प. यांनी अर्जदार यांचे दागिणे काढून घेवून त्यांचे जवळ ठेवले आहेत. तसेच अर्जदार यांचे नांवे असलेले महत्वाचे दस्तऐवज व कागदपत्रे यातील वि.प. यांच्या ताब्यात आहेत. सदरचे दागीणे हे अर्जदार हिचे स्त्रीधन आहे. तसेच इतर कागदपत्रे ही तीला दैनंदीन कामाकाजात उपयोगी असणारे आहेत. सबब अर्जदार हिने भिशी पुस्तक, पिग्मी पुस्तक, पैशाची पर्स, सोन्याचा नेकलेस, चांदीचा कडा, सोन्याचे कानातील टॉप्स व बुगडया इत्यादी परत मिळावे अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. वि.प. यांनी निशाणी १६ कडे प्रस्तुत अर्जास म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. वि.प. यांचे असे कथन आहे की,त्यांनी अर्जदार हिचे दागीणे केंव्हाही काढून घेतलेले नाहीत. दागिणे व कागदपत्रे अर्जदार घरातून जाताना घेवून गेल्या आहेत व ते अर्जदार हिचेच ताब्यात आहेत. त्यामुळे कागदपत्रे व दागिणे देण्याचा प्रश्नच नाही. सबब वि.प. यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** अर्ज निशाणी १३ व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. अर्जदार

यांनी मूळ अर्ज कौटूंबीक हिंसाचार कायदा कलम १२, १७, १८, १९, २० व २२ अन्वये दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी तीची कागदपत्रे व दागीने वि.प. यांच्याकडून मिळणेबाबत विनंती केली आहे. याउलट वि.प. यांच्या कथनानुसार सदर वस्तु अर्जदार ही घेवून गेलेली आहे. अर्जदार हिने जरी पिग्मी व भिशी पासबुक व दागीने मिळणेबाबत विनंती केली असली तरी सदरचे दागिणने तीच्याच मालकीचे आहेत किंवा ते तीचे स्त्रीधन आहे याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच पासबुकाबाबत ही ती कोणत्या बँकेची अथवा संस्थेची आहेत याबाबतही कोणतेही माहीती दाखल केलेली नाही. त्यामुळे सदरची बाब ही प्रस्तुत कामातील पुराव्याअंति गुणदोषावर ठरविणे योग्य होणार आहे. त्यामुळे सदयस्थीतीला त्याबाबत आदेश पारीत करणे न्यायोचित होणार नाही. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

अर्ज निशाणी १३  नामंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2024.08.31 17:00:43 +0530

**दि. ३०/०८/२०२४** **(संजय दि.वानखेडे)**

**इचलकरंजी** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१, कोर्ट नं.४, इचलकरंजी**